

## महात्मा फुले: शेतकऱ्यांचे कैवारी

सविस्तर वृत्त पान २ वर


www.attalmat.com

# अट्टलमत

RNI.No. MAHMAR/2007/21199 Postal Regd. No : H2/RNP/AGD/283/2022-23

■ वर्ष -19, अंक-31 ■ छत्रपती संभाजीनगर, दि. सोमवार, 6 एप्रिल 2026 ■ किंमत 2 रूपये, पाने -4


# संभाजीनगर जि.प. सभापती निवडणूक बिनविरोध, सेना, उबाठाचे सदस्य गैरहजर : सभापती म्हणून सचिन गरड, मीनाक्षी पवार, अनिता मोटे, बालाजी सोनटक्के यांची वर्णी



**छत्रपती संभाजीनगर**
**(अट्टल मत प्रतिनिधी)**

छत्रपती संभाजीनगर जिल्हा परिषदेच्या अध्यक्ष-उपाध्यक्ष पदापाठोपाठ आता विषय समिती सभापती निवडीतही भाजपने आपला राजकीय वरचष्मा सिद्ध केला आहे. बहुमताचे गणित अत्यंत चतुराईने जुळवल्यामुळे सभापती पदाची निवडणूक बिनविरोध पार पडली. यामध्ये भाजपने आपल्या दोन महिला सदस्यांसह मित्रपक्ष राष्ट्रवादी आणि सचिन गरड या अपक्ष समर्थकाला संधी देऊन सत्तेचे समतोल राखला आहे.

या निवडणुकीसाठी शिवसेना आणि उबाठाचे सदस्य गैरहजर राहिले. सभापतिपदी भाजपच्या मीनाक्षी पवार आणि अनिता मोटे यांची निवड झाली आहे. तसेच सत्तेला सुरुंग लागू नये म्हणून भाजपने शब्द दिल्याप्रमाणे राष्ट्रवादी काँग्रेसचे (अजित पवार गट) बालाजी सोनटक्के यांनाही सभापती पद दिले आहे. विशेष म्हणजे भाजप पुरस्कृत अपक्ष सदस्य सचिन गरड यांनाही या सत्तेत वाटा मिळाला आहे. पक्षीय बलाबल - एकूण जागा ६३ भाजप - २३ शिवसेना - २१ उबाठा - ०९ रिष्ट्रवादी अजित पवार - ०४ राष्ट्रवादी शरद पवार - ०१ प्रहार - १ काँग्रेस - ०१ (भाजपमध्ये प्रवेश) इतर - ०३ विरोधकांची ऐनवेळी माघार महाविकास आघाडीकडून कृष्णा पाटील डोणगावकर आणि राष्ट्रवादी (शरद पवार गट) कडून गीतांजली वरुण पाथ्रीकर यांनी उमेदवारी अर्ज खरेदी केले होते. मात्र, भाजपचे भक्कम संख्याबळ आणि अपक्षांची मिळालेली साथ पाहून विरोधकांनी निर्धारित वेळेत अर्ज दाखल केले नाहीत. परिणामी, निवडणूक बिनविरोध झाली. पीठासीन अधिकारी यांनी सर्व ३१ उपस्थित सदस्यांच्या सह्या घेतल्या. त्यानंतर दाखल अर्जांपैकी मीनाक्षी पवार यांची महिला बालविकास सभापतिपदी तर बालाजी सोनटक्के यांची समाज कल्याण सभापतिपदी निवड झाली आहे. उर्वरित दोघांना सर्वसाधारण सभेत पद वाटप करण्यात येणार आहे. १ खासदार, ६ आमदार तरी शिवसेना जिल्हा परिषदेत विरोधी पक्षात : कालपर्यंत दोन्ही शिवसेना एकत्र येऊन भाजपला रोखण्यासाठी 'फील्डिंग' लावत असल्याची चर्चा राजकीय वतुर्ळात होती. मात्र, प्रत्यक्ष निवडणुकीत भाजपची रणनीती शिवसेनेवर भारी पडली. १ खासदार आणि ६ आमदार असूनही शिवसेनेला जिल्हा परिषदेच्या सत्तेपासून दूर राहावे लागले आहे. येत्या काळामध्ये शिवसेना विरोधी पक्षात बसणार आहे. या विजयामुळे ग्रामीण भागातील भाजपची पकड अधिक घट्ट झाली असून, आगामी विधानसभा निवडणुकीच्या दृष्टीने हा निकाल महत्त्वाचा मानला जात आहे. जिल्हा परिषदेत सभापती निवडणूक पार पडली.

या वेळी विविध मान्यवर. भाजपने आपल्या गटातून मीनाक्षी पवार व अनिता मोटे यांना संधी देत महिला नेतृत्वाला पुढे आणले आहे. महायुतीचा समन्वय साधत राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) कडून बालाजी सोनटक्के यांना संधी दिली तर अपक्ष असूनही भाजप पुरस्कृत सचिन गरड यांनाही सभापतीपद देऊन पक्षाने आपली राजकीय पकड अधिक मजबूत केली आहे.

### महिलांपर्यंत शासनाच्या योजना पुरवणार - मीनाक्षी पवार

"महिला व बालविकास सभापतीपदी विराजमान होताच मीनाक्षी पवार यांनी महिलांसाठी शासनाच्या ज्या योजना आहेत त्यांचा प्रचार प्रसार व जनजागृती करून शेवटच्या घटकापर्यंत त्याचा फायदा पोहोचवण्याचे कार्य मी माझ्याकडून यशस्वीरित्या पूर्ण करेल असे प्रसार माध्यमांशी बोलताना सांगितले.

### संधीचे मी सोन केल्याशिवाय राहणार नाही- बालाजी सोनटक्के

"बालाजी सोनटक्के यांची समाजकल्याण सभापतीपदी निवड झाल्यानंतर प्रसार माध्यमांशी बोलताना ते म्हणाले की तळागाळातील लोकांपर्यंत पोहोचण्यासाठी त्यांच्या समस्या जाणून घेण्यासाठी व त्याचे निवारण करण्यासाठी मला ही संधी मिळालेली आहे आणि त्या संधीचे मी सोन केल्याशिवाय राहणार नाही. समाजातील उपेक्षित पीडित जे लोक आहेत त्यांच्या उत्थानासाठी हे खाते आहे. या खात्याचे जे ध्येय आहे त्या ध्येयापर्यंत पोहोचण्याचा आणि जी सध्याची परिस्थिती आहे ती परिस्थिती सुधारण्याचा मी प्रयत्न करेल. असे नवनिर्वाचित सभापती बालाजी सोनटक्के यांनी सांगितले.

# सोयगाव तालुक्याचा संयम संपला वारंवार होणारा अन्याय आता सहन केला जाणार नाही!- भाजप कार्यकर्ता

**छत्रपती संभाजीनगर**
**(अट्टल मत प्रतिनिधी)**

सोयगाव तालुक्याला कायम दुय्यम वागणूक देण्याचे राजकारण आता उघड झाले आहे. अनेक वर्षांपासून एकच पॅटर्न सुरू आहे - मेहनत सोयगावच्या कार्यकर्त्यांनी करायची, मतदान सोयगावने द्यायचे, पण सत्तेचे आणि पदांचे फळ मात्र सिल्लोड तालुक्यानेच उपभोगायचे!

आज परिस्थिती अशी झाली आहे की, सोयगाव तालुक्यातील कार्यकर्त्यांनी फक्त सिल्लोडच्या नेत्यांची चपला उचलायच्या, उजरेगिरी करायची आणि आदेश पाळायचे - एवढेच काम उरले आहे का? हा संतप्त सवाल आता प्रत्येक कार्यकर्ता विचारत आहे. लोकसभा निवडणुकीत आमखेडा सर्कलमधून दानवे साहेबांना सर्वाधिक लीड देणारा सोयगाव तालुकाः विधानसभेत सुरेश बनकर यांना सर्वाधिक मतदान देणारा हाच तालुकाः पण जेव्हा पद वाटपाची वेळ येते, तेव्हा सोयगावला का डावलले जाते?

हे गणित सामान्य कार्यकर्त्यांना कळते, मग पक्षाच्या वरिष्ठ नेतृत्वाला का कळत नाही? की जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले जाते?

यावेळी तरी जिल्हा परिषद सदस्या सौ. पुष्पाताई प्रकाश काळे यांना अध्यक्ष किंवा किमान सभापती पद दिले जाईल, अशी अपेक्षा होती. पण तीही पायदळी तुडवण्यात आली. यामुळे स्पष्ट झाले की, सोयगाव तालुक्याला फक्त 'वापरून घेण्याचे' राजकारण सुरू आहे.

प्रत्येक वेळेस सिल्लोड तालुक्यालाच संधी, प्रत्येक वेळेस सोयगावला अन्याय, आणि प्रत्येक वेळेस सोयगावच्या संयमाची परीक्षा! तालुक्यातील एखादे नेतृत्व उभे राहू लागले की, ते वरच्या लोकांना सहन होत नाही - त्यामुळेच ते मुद्दाम दाबले जाते, हे आज पुन्हा एकदा सिद्ध झाले आहे. हीच परिस्थिती कायम राहिली, तर येणाऱ्या विधानसभा २०२९ सोयगाव विधानसभा निवडणुकांमध्येही हाच खेळ पुन्हा होणार आहे - सिल्लोड तालुक्यातील नेतेच वरचढ राहणार, आणि सोयगाव तालुक्याचा वापर फक्त मतदानापुरताच केला जाणार. ही बाब आता जनतेने गांभीर्याने लक्षात घेणे गरजेचे आहे.

जिल्हा परिषद निवडणुकीतही हेच चित्र दिसले - सावळदबारा सर्कलमध्ये बाहेरून उमेदवार आणून उभा करण्यात आला. मग एक सरळ प्रश्न उभा राहतो - सोयगाव तालुक्यात एकही सक्षम, पात्र नेता नव्हता का? की जाणीवपूर्वक बाहेरचा उमेदवार आयात करावा लागला? जर स्थानिक नेतृत्वावरच विश्वास नसेल, तर मग कार्यकर्त्यांनी आणि जनतेने किती दिवस फक्त 'होकार' द्यायचा? आज अशी वेळ आली आहे की, जनतेलाही स्वतःचा विचार करावा लागणार आहे. फक्त मतदानासाठी आठवण काढायची आणि सत्तेसाठी विसरून जायचे - हे धोरण आता चालणार नाही. सोयगाव तालुका जागा होत आहे, आणि हा आवाज आता थांबणारा नाही

# देवगिरी कॉलेज परिसरात तरुणावर चाकू हल्ला; ६-७ तासांत तिघे आरोपी जेरबंद

**छत्रपती संभाजीनगर**
**(अट्टल मत प्रतिनिधी)**

येथे देवगिरी कॉलेजच्या मागील गेटजवळ एका तरुणावर चाकूने जीवघेणा हल्ला झाल्याची धक्कादायक घटना घडली असून, या प्रकरणात वेदांतनगर पोलिसांनी अवघ्या ६ ते ७ तासांत तिन्ही आरोपींना अटक करत वेगवान कारवाईचे उदाहरण घालून दिले आहे.

फिर्यादी इम्रान हबीब शेख (वय २२, रा. जमालनगर, देवळाई) यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, दिनांक १ एप्रिल २०२६ रोजी सायंकाळी सुमारे ४.१० वाजण्याच्या सुमारास ही घटना घडली. आरोपी निखील साळवे याने 'तू तिच्यासोबत का बोलतोस व भेटतोस? या कारणावरून इम्रान यांना शिवीगाळ करून धमकावले व देवगिरी कॉलेजच्या मागील गेटजवळ बोलावले. यानंतर निखील साळवे, विवेक शेलार आणि अवि पाटील या तिघांनी इम्रान यांना बाजूच्या गल्लीत नेले. तेथे निखील साळवे याने पुन्हा शिवीगाळ केली. तसेच विवेक शेलार व अवि पाटील यांनी निखील याला हल्ल्यास प्रवृत्त केल्याचा आरोप आहे. त्यानंतर निखील साळवे याने कमरेला लपवलेला लोखंडी चाकू काढून इम्रान यांच्यावर जीवघेणा हल्ला केला. या हल्ल्यात इम्रान यांच्या डाव्या कानावर व डोक्याच्या मागील भागावर गंभीर जखमा झाल्या. घटनेनंतर जखमी इम्रान यांना तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले. या प्रकरणी दिनांक २ एप्रिल २०२६ रोजी सायंकाळी ४.३८ वाजता वेदांतनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

गुन्हा घडल्यानंतर तिन्ही आरोपी फरार झाले होते. मात्र, पोलिसांनी तातडीने शोधमोहीम राबवून अवघ्या सहा ते सात तासांत त्यांना ताब्यात घेतले. अटक करण्यात आलेल्या आरोपींमध्ये निखिल साळवे (वय २१, मूळ रा. जाफराबाद, जालना; सध्या वडगाव कोल्हाटी), विवेक शेलार (वय १९, रा. वडगाव कोल्हाटी) आणि अवी पाटील (वय २०, मूळ रा. खुलताबाद; सध्या शहानूरवाडी) यांचा समावेश आहे. विशेष म्हणजे तिन्ही आरोपी हे बीसीए प्रथम वर्षाचे विद्यार्थी असल्याची माहिती समोर आली आहे. ही कारवाई पोलीस आयुक्त प्रवीण पवार, डीसीपी पंकज आतुलकर आणि एसीपी सागर देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. तसेच वेदांतनगर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक प्रविणा यादव, पोलीस उपनिरीक्षक नामदेव सुपे, पोलीस उपनिरीक्षक संगीता गिरी यांच्यासह पोलीस पथकाने या मोहिमेत महत्त्वाची भूमिका बजावली. वेदांतनगर पोलीस ठाण्याच्या पथकाने दाखवलेल्या या जलद आणि प्रभावी कारवाईचे सर्वत्र कौतुक होत असून, पुढील तपास सुरू आहे.

### वेदांतनगर पोलीस ठाण्याच्या पथकाने दाखवलेल्या या जलद आणि प्रभावी कारवाईचे कौतुक



# आला उन्हाळा, आरोग्य सांभाळा

जिल्ह्यात सर्वसाधारणपणे दरवर्षी एप्रिल ते जून या महिन्यात उष्माघाताचा प्रादुर्भाव होतो. तसेच त्यामुळे मृत्यू होणेही संभव असते. त्यातच आतापासूनच जिल्ह्यातील कमाल तापमान वाढत चालले आहे. जिल्ह्यातील तापमानाचा पारा ४० अंशावर जात आहे. या पार्श्वभूमीवर उष्माघाताच्या प्रकोपापासून वाचण्यासाठी नागरिकांनी जागरूक राहण्याची गरज आहे. त्यासाठी नागरिकांना जागरुक करण्यासाठी खालील माहिती देण्यात आली आहे.

**उष्माघाताची लक्षणे**

१. उन्हाळ्यात शरीराचे तापमान वाढल्यास त्याला उष्माघात म्हणतात.

२. मळमळ, उलटी, ताप, त्वचा कोरडी पडणे, भूक न लागणे, थकवा, चक्कर येणे, डोकेदुखी या तक्रारी सुरू होतात.

३. मनाची स्थिती बिघडते, व्यक्ती असंबंध बडबड करते, चिडचिड करते. जीभ जड होते, जास्त घाम येतो, पायात गोळे येतात.

४. पोटऱ्यात वेदना किंवा पेटके येणे, रक्तदाब वाढणे, मानसिक बेचैनी व अस्वस्थता, बेशुद्धावस्था.

**उष्माघाताची कारणे**

उन्हाळ्यात शेतात किंवा इतर मजुरीची कामे फार वेळ करणे, कारखान्याच्या बॉयलर रुममध्ये तसेच काच कारखान्यात काम, अधिक तापमानाच्या खोलीत काम, घट्ट कपड्याचा वापर.

**नागरिकांनी घराबाहेर पडताना काळजी घ्यावी. उष्माघाताचा त्रास जाणवू लागल्यास वैद्यकीय सल्ल्यासाठी किंवा निदानासाठी वैद्यकीय अधिकाऱ्याचा सल्ला घ्यावा. लहान मुले, ज्येष्ठांनी विशेष काळजी घ्यावी. असे आवाहन जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद छत्रपती संभाजीनगर. डॉ. अभय धानोरकर यांनी केले आहे.**

**प्रतिबंधात्मक उपाय–** दर तासाला १ ते दीड ग्लास पाणी प्यावे. लिंबू सरबत, शहाळे, फळांचा ताजा रस, पन्हे, कोकम सरबत, ताक, लस्सी असे द्रवपदार्थ घ्यावेत. आराम करावा, सैलसर, फिक्कट रंगाचे किंवा पांढऱ्या रंगाचे कपडे परिधान करावेत. उन्हाळ्याची चाहूल लागली की वाढत्या तापमानात फारवेळ कष्टाची कामे टाळणे. कष्टाची कामे सकाळी किंवा सायंकाळी कमी तापमानात करणे, जलसंजीवनीचा वापर, भरपूर पाणी प्यावे, सरबत प्यावे, उन्हामधील काम अधूनमधून थांबवावे, सावलीत विश्रांती घ्यावी, उन्हात बाहेर जाताना काळ्या काचेचा चष्मा, डोक्यास उन लागू नये म्हणून टोपी, टॉवेल, फेटा, उपरणे यांचा वापर करावा. गरज नसेल तर उन्हात बाहेर फिरू नये. जर बाहेर जावे लागलेच तर उन्हापासून संरक्षण होईल याची काळजी घ्यावी.

**प्राथमिक उपचार–** उष्माघाताचा त्रास जाणवू लागल्यास प्रथम भरपूर पाणी प्यावे. उन्हातून आल्यानंतर थोडावेळ बसा आणि नंतर ग्लासमध्ये पाणी ओतून प्या, खूप थंड, बर्फ टाकलेले पाणी पिऊ नये, रुग्णास वातानुकूलित किंवा मोकळ्या हवेशीर खोलीत ठेवणे. खोलीत पंखे, कुलर असावेत. रुग्णाचे तापमान खाली आणण्याच्या दृष्टीने प्रयत्न रुग्णास थंड पाण्याने आंघोळ घालावी, रुग्णाच्या कपाळावर थंड पाण्याच्या पट्ट्या ठेवणे, आइस पॅक लावणे, आवश्यकतेनुसार सलाइन देणे. डॉक्टरांचा सल्ला घ्यावा.

**आरोग्य विभागाची सज्जता –** उष्माघात रुग्णास सलाईन द्वारे औषधी मात्र देण्यात येऊन प्राथमिक स्तरावरील उपचार करण्यात येतात. उन्हाची तीव्रता वाढू लागल्याने उष्णतेची निगडित आजारांचा धोका वाढण्याची शक्यता आहे. आणि उष्माघाताच्या रुग्णसंखेत वाढ होऊ नये यासाठी उष्माघात प्रतिबंध उपाय योजना अंतर्गत प्राथमिक आरोग्य केंद्र वैद्यकीय अधिकारी यांचे प्रशिक्षण घेण्यात आले असून, जिल्ह्यातील प्रत्येक प्राथमिक आरोग्य केंद्र स्तरावर उष्माघात कक्ष स्थापन करण्यात आला. प्रत्येक प्राथमिक आरोग्य केंद्रात एक खाट उष्माघात रुग्णासाठी राखीव ठेवण्यात आली असून, उष्माघात कक्षामध्ये हवा खेळती राहील, खिडक्या व दरवाजे मोकळे असतील, कक्षामध्ये कुलर, पंखा एसी इ. पैकी २४ तास चालू स्थितीत उपलब्ध राहील, पुरेसे पिण्याचे थंड पाणी उपलब्ध राहील, तापमान नियंत्रण आवश्यक यंत्रणा उपलब्ध करून दिली जावी, ORS द्रावण पाकीट उपलब्ध असावे, आईस पॅक उपलब्ध असतील, उष्माघात कक्षा बद्दलची माहिती संस्थेच्या मुख्य प्रवेशद्वारा जवळ निर्देशित करण्यात येईल, उष्माघात कक्षा हा २४ तास कार्यरत ठेवण्यात येईल.

# महात्मा फुले: शेतकऱ्यांचे कैवारी

**(११ एप्रिल: महात्मा जोतीराव फुले जयंती विशेष.)**

महात्मा जोतिराव गोविंदराव फुले यांचा जन्म दि.११ एप्रिल १८२७ रोजी झाला. हे एक भारतीय समाजसुधारक, समाजप्रबोधक, विचारवंत, समाजसेवक, लेखक, तत्त्वज्ञ आणि क्रांतिकारी कार्यकर्ते होते. त्यांना महात्मा फुले आणि जोतिबा फुले म्हणूनही ओळखले जाते. त्यांच्या पत्नी सावित्रीबाई फुले या भारतातील पहिल्या महिला शिक्षिका होत्या. सप्टेंबर १८७३ मध्ये त्यांनी महाराष्ट्रात सत्यशोधक समाज नावाची संघटना स्थापन केली. त्यांनी स्त्रियांच्या आणि मागासलेल्या आणि अस्पृश्यांच्या उन्नतीसाठी अनेक कामे केली. समाजातील सर्व घटकांना शिक्षण देण्याचे ते खंबीर पुरस्कर्ते होते. ते भारतीय समाजात जात-आधारित विभाजन आणि भेदभावाच्या विरोधात होते.



स्त्रियांना शिक्षणाचा हक्क मिळवून देणे, बालविवाहाला विरोध करणे, विधवा विवाहाला पाठिंबा देणे हे त्यांचे मूळ उद्दिष्ट होते. म.फुले यांना समाजाला कुप्रथा, अंधश्रद्धेच्या पाशातून मुक्त करायचे होते. त्यांनी आपले संपूर्ण आयुष्य महिलांना शिक्षण देण्यात, महिलांना त्यांच्या हक्कांची जाणीव करून देण्यात घालवले.

१९व्या शतकात महिलांना शिक्षण दिले जात नव्हते.

फुले यांना स्त्री-पुरुष भेदभावापासून वाचवायचे होते. त्यांनी पुण्यात मुलींसाठी भारतातील पहिली शाळा बांधली. त्यावेळच्या स्त्रियांच्या दयनीय अवस्थेमुळे फुले खूप व्यथित आणि दु:खी झाले होते, म्हणूनच त्यांनी समाजात क्रांतिकारी बदल घडवून आणण्याचा दृढ निश्चय केला. त्यांनी स्वतः त्यांच्या पत्नी सावित्रीबाई फुले यांना शिक्षण दिले. सावित्रीबाई फुले या भारतातील पहिल्या महिला शिक्षिका ठरल्या.

सुरुवातीचे जीवन: महात्मा ज्योतिबा फुले एका वर्षांचे असताना त्यांच्या आईचे निधन झाले. त्यांचे कुटुंब अनेक पिढ्यांपूर्वी साताऱ्याहून पुण्यात आले आणि फुलांचे गजरे बनवू लागले. त्यामुळे माळीच्या कामात गुंतलेली ही माणसे 'फुले' म्हणून ओळखली जायची. ज्योतिबांनी काही काळापूर्वीपर्यंत मराठीतून शिक्षण घेतले, ते सोडून दिले आणि नंतर वयाच्या २१व्या वर्षी इंग्रजीमध्ये सातवीचे शिक्षण पूर्ण केले. सन १८४०मध्ये त्यांचा विवाह सावित्रीबाई यांच्याशी झाला, त्यानंतर त्या स्वत: प्रसिद्ध समाजसेविका झाल्या.

पती-पत्नी दोघांनीही दलित आणि स्त्री शिक्षण क्षेत्रात एकत्र काम केले. ते एक कष्टकरी आणि सामाजिक कार्यकर्ता होते.

कार्यक्षेत्र: त्यांनी विधवा आणि महिलांच्या कल्याणासाठी खूप काम केले, त्यासोबतच त्यांनी शेतकऱ्यांची स्थिती सुधारण्यासाठी आणि त्यांच्या कल्याणासाठीही खूप प्रयत्न केले. ज्योतिबांना संतांची चरित्रे वाचण्याची खूप आवड होती. जेव्हा देवासमोर सर्व स्त्री-पुरुष समान असतात, तेव्हा उच्च-नीच असा भेद का असावा, हे त्यांना कळून चुकले होते. स्त्रियांची स्थिती सुधारण्यासाठी आणि त्यांच्या शिक्षणासाठी फुले यांनी सन १८४८मध्ये शाळा उघडली.

या कामासाठी देशातील पहिली शाळा होती. मुलींना शिकवण्यासाठी त्यांना शिक्षक मिळाला नाही, म्हणून त्यांनी स्वतः काही दिवस हे काम करून पत्नी सावित्री फुले यांना पात्र बनवले. काही लोकांनी सुरुवातीपासूनच त्यांच्या कामात अडथळे आणण्याचा प्रयत्न केला, पण फुले पुढे सरकत असताना त्यांनी वडिलांवर दबाव आणून पती-पत्नीला घराबाहेर काढले, यामुळे त्यांचे काम काही काळ थांबले, पण लवकरच त्यांनी मुलींसाठी एकामागून एक तीन शाळा उघडल्या.

महात्मा पदवी: गरीब आणि दुर्बलांना न्याय मिळवून देण्यासाठी ज्योतिबांनी सन १८७३मध्ये सत्यशोधक समाजाची स्थापना केली. त्यांची समाजसेवा पाहून सन १८८८मध्ये मुंबईत एका विशाल सभेत त्यांना 'महात्मा' ही पदवी देण्यात आली.

ज्योतिबांनी ब्राह्मण-पुरोहिताविना विवाह विधी सुरू केला आणि त्याला मुंबई उच्च न्यायालयानेही मान्यता दिली. ते बालविवाहाच्या विरोधात होते आणि विधवा पुनर्विवाहाचे समर्थक होते. आपल्या हयातीत त्यांनी गुलामगिरी, तृतीय रत्न, छत्रपती शिवाजी, राजा भोसलेंचा पवाडा, शेतकऱ्यांचा आसूड, अस्पृश्यांचा टाहो अशी अनेक पुस्तकेही लिहिली. महात्मा ज्योतिबा आणि त्यांच्या संघटनेच्या संघर्षामुळे सरकारने 'कृषी कायदा' मंजूर केला.

धर्म, समाज आणि परंपरा यांचे सत्य समोर आणण्यासाठी त्यांनी अनेक पुस्तकेही लिहिली.



– संकलन व शब्दांकन –
**श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरूजी.**
(एक प्राणी-पक्षी प्रेमी.)
रामनगर वॉर्ड, गडचिरोली.

सन १८८३मध्ये स्त्रियांना शिक्षण देण्याच्या महान कार्यासाठी, त्यांना तत्कालीन ब्रिटिश भारतीय सरकारने 'स्त्री शिक्षणाचे जनक' म्हणून गौरवले. दि.२८ नोव्हेंबर १८९० रोजी वयाच्या ६३व्या वर्षी पुणे येथे त्यांचे दु:खद निधन झाले.

पावन जयंतीपर्वावर म. राष्ट्रपितामह जोतीराव फुलेजींना शतदा विनम्र अभिवादन.

# युगप्रवर्तक डॉ.बाबासाहेब आंबेडकर १३५ व्या जयंती उत्सव समीतीच्या अध्यक्षपदी सतीश नरवडे



**छत्रपती संभाजीनगर**
**(अट्टल मत प्रतिनिधी)**

भिमशक्तीचे नेते हांडोरे साहेबांच्या आदेशाने भिमशक्ती संटनेच्या पदाधिकाऱ्यांची महत्वपूर्ण बैठक जिल्हा अध्यक्ष राजू भाऊ मंजुळे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली. भिमशक्ती संघटनेच्या वतीने १३५ वा जयंती उत्सव सोहळा साजरा करण्यासाठी विचार विनिमय होवून उत्सव समितीच्या अध्यक्षपदी सतीश नरवडे यांची नियुक्ती करन्यात आली. या प्रसंगी संघटनेचे वरिष्ठ नेते दिनकर दादा ओंकार, मिलीभाऊ दाभाडे, संतोष भिंगारे, शांतीलाल, सचीन शिरसाठ, शांतीलाल गायकवाड , भाऊसाहेब नवगीरे, कैलास जुंबडे विनोद कोरके, प्रेम चव्हाण, धनंजय रायबोले, इत्यादींनी हजर राहून बैठकीस मार्गदर्शन केले.

संघटनेची उर्वरित कार्यकारिणी पूढील प्रमाणे ठरविन्यात आली. अध्यक्ष : सतीश नरवडे उपाध्यक्ष:गौतम जमधडे, सूनील काकडे स्वागतअध्यक्ष: मधुकर नगराळे कार्याध्यक्ष: अल्केश कोरके सचिव: स्वप्निल नरवडे सहसचिव: संदीप कांबळे कोषाध्यक्ष: सिद्धार्थ तेजाळ, विशंभर भालेराव प्रसिद्धीप्रमुख: अनिरुद्ध काळे, संघर्ष मोकळे अशा प्रमाणे असून भिम शक्ती संघटनेच्या वतीने विविध कार्यक्रमाचे आयोजन येत्या १४ एप्रिलपर्यंत करण्यात येणार आहे.

# ‘रामायण’ निवासस्थानी श्री भद्रा हनुमंत जन्मोत्सवाची परंपरा

## २०१ अन्नस फळ व पानांनी विशेष श्रृंगार



**छत्रपती संभाजीनगर (अट्टल मत प्रतिनिधी)**

धावणी मोहल्ला येथे जयसुख पटेल यांच्या रामायण या निवासस्थानी गेल्या ६ वर्षापासून प्रती भद्रा हनुमंताचा जन्मोत्सव सोहळा भाविकांच्या उपस्थितीत साजरा होत असतो. वर्षभर या रामायण मंदिरात विविध सण उत्सव साजरे करण्यात येतात जय सुख पटेल यांच्या निस्सिम भक्तीतून या मंदिराची निर्मीती कोरोना काळात झाली आहे. २०१ अन्नस फळ व त्यांच्या पानांचा वापर मूर्तीस श्रृंगार व गर्भगृहास सजावट करण्यात आली. तसेच संपूर्ण सप्ताहात विविध श्रृंगार करण्यात आले.

हनुमान जन्मोत्सवानिमित्त २७ मार्च ते २ एप्रिल यादरम्यान राम कथेचे आयोजन करण्यात आले. लघु रुद्राभिषेक, पूर्व संध्येपासून ते जन्मोत्सवापर्यंत अखंड दुग्ध, जलधारेचा अभिषेक सुरू होता. यादरम्यान सुंदरकांड पाठाचेही वाचन करण्यात आले. हनुमंतरायाच्या जन्मस्थान किशकिंन्धा येथील



पंपा सरोवरातील जल व इतर पवित्र नद्यांचे जल व पंचामृत याने हनुमंत रायाचा ब्रम्हमुर्हतावर अभिषेक करण्यात आला. पहाटे ६. १० शंकाच्या मधुर ध्वनीत जन्मोत्सवाचा उत्सव साजरा करण्यात आला.

दिवस भर विविध क्षेत्रातील भाविक भक्तांनी दर्शनासाठी गर्दी केली होती. सायंकाळी भाविकांसाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. या हजारो भाविकांनी लाभ घेतला.

**श्रीराम कथेची सांगता**

श्री हनुमान जन्मोत्सवानिमित्त श्रीराम कथेचे आयोजन करण्यात आले होते. श्री राम कथा वाचक प्रदीप महाराज मुळे यांच्या श्री मुखातून वाचन करण्यात आले. राम नवमी ते हनुमान जयंती या दरम्यान श्रीराम कथेचे आयोजन करण्यात आले होते. त्याची हनुमान जयंतीस सांगता करण्यात आली. श्रीराम मर्यादा पुरुषोत्तम आहेत, म्हणजेच त्यांनी जीवनात सर्व मर्यादांचे काटेकोरपणे पालन केले. ते दयाळू, कुशल व्यवस्थापक आणि स्थितप्रज्ञ होते. यासह प्रभू श्री रामचंद्रांच्या विविध गुणांचे दर्शन प्रदीप महाराज मुळे यांनी सर्व भक्तांना करून दिले.

“कोरोना काळात भक्तांना मंदिरात जाण्यास बंदी होती त्यावेळी मी भद्रा मारोतीचा १५ किलो शेंदूर आणून या मूर्तीची विधीवत स्थापना केली आणि आज भक्तांच्या नवसाला पावणारा प्रति भद्रा हनुमान याची प्रचीती भाविकांना येत आहे. मी तर फक्त निमीत्त मात्र आहे.

**– जयसुख पटेल**

# रमेश अण्णा मुळे यांना ॲट्रासिटीच्या गुन्ह्यात अटकपूर्व जामीन मंजूर

## ३१ मार्चला विशेष न्यायालयाने मंजूर केला जामीन

**छत्रपती संभाजीनगर (अट्टल मत प्रतिनिधी)**

येथील ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते रमेशअण्णा मुळे यांच्याविरोधात लोणार पोलिस ठाण्यात दाखल ॲट्रासिटीच्या गुन्ह्यात मेहकर येथील विशेष न्यायालयाने ३१ मार्चला सशर्त अटकपूर्व जामीन मंजूर केला आहे. सार्वजनिक ठिकाणी अपमान होईल, या उद्देशाने मुळे यांनी फिर्यादीला जातीवाचक शिवीगाळ केली नसल्याचे प्रथम दर्शनी दिसून येत असल्याचे निरीक्षण जामीन मंजूर करताना न्यायालयाने नोंदविले.

या घटनेविषयी अधिक माहिती अशी की, छत्रपती संभाजीनगर येथील ज्येष्ठ समाजसेवक रमेशअण्णा मुळे यांनी त्यांच्या पुतण्या संजय मुळे यांच्याविरोधात मुकुंदवाडी पोलिस ठाण्यात फसवणुकीचा गुन्हा नोंदविला आहे. या प्रकरणात चुलता-पुतण्यांतील वाद मिटावा, यासाठी त्यांच्या मूळ गाव उदनापूर (ता. लोणार, जि. बुलडाणा) येथील एका महिलेने मध्यस्थी करण्याचा प्रयत्न केला होता. मुळेअण्णा यांनी ही मध्यस्थी नाकारली होती.

दरम्यान, मुळे अण्णा हे १२ मार्चला आईला भेटायला मूळ गावी गेले असता तेथे संबंधित महिला त्यांच्या घरी आली आणि तिने मुळे यांच्याशी भांडण सुरू केले. याविषयी मुळे यांनी त्या महिलेविरोधात लोणार पोलिस ठाण्यात गुन्हा नोंदविला होता. ही बाब समजल्यानंतर मध्यरात्री १ वाजता त्या महिलेने रमेशअण्णा मुळे यांच्याविरोधात ॲट्रासिटी आणि विनयभंगाचा गुन्हा नोंदविला होता. याप्रकरणाचा तपास मेहकरचे पोलिस उपअधीक्षक करत आहेत. याप्रकरणात अटक टाळण्यासाठी मुळे यांनी ॲड. एस. बी. तौर यांच्यामार्फत अटकपूर्व जामीन अर्ज मेहकर येथील विशेष न्यायालयात दाखल केला होता.

या अर्जाच्या सुनावणीच्यावेळी मुळे यांच्या वतीने युक्तिवाद करताना नमूद केले की, मुळे यांच्या घरी जाऊन तक्रारदार महिलेने स्वतः त्यांना शिवीगाळ करुन भांडण करण्यास प्रवृत्त केले. या घटनेची व्हिडिओ क्लीप सादर केली. या क्लीपनुसार पीडितेचा विनयभंग केला नसल्याचे दिसून येते. पीडितेला जातीवाचक शिवीगाळ केली नाही. ही तक्रार खोटी असल्याचे ॲड. तौर यांनी पुराव्यांनिशी न्यायालयास सांगितले. तसेच तौर यांनी न्यायनिवाडा केशव महातो खटल्याचा संदर्भ सादर केला. सरकारपक्षाच्यावतीने अटक जामीन अर्जास विरोध करण्यात आला होता. उभय पक्षाचा युक्तिवाद ऐकल्यानंतर न्यायालयाने रमेशअण्णा मुळे यांना सशर्त अटकपूर्व जामीन अर्ज मंजूर केला.

# मंत्रालय प्रवेशासाठी लागणारी १० हजार ओळखपत्रे गायब

**मुंबई (अट्टल मत प्रतिनिधी)**

मंत्रालयातील प्रवेश प्रक्रियेत सुसूत्रता आणण्यासाठी सुरू करण्यात आलेल्या ‘डिजी प्रवेश’ प्रणालीतील १० हजार ओळखपत्रे अभ्यागतांनी परत न केल्याची माहिती समोर आली आहे. नियमानुसार प्रवेश संपल्यानंतर ही कार्डे जमा करणे आवश्यक असते; मात्र १० हजार कार्डे मंत्रालयाबाहेर गेल्याने आता प्रशासनाने ती परत मिळवण्यासाठी विशेष मोहीम हाती घेतली आहे.

राज्याच्या कानाकोपऱ्यातून नागरिक आपली कामे घेऊन मंत्रालयात येत असतात. त्यांना जलद प्रवेश मिळावा यासाठी अत्याधुनिक ‘डीजी ॲप’च्या माध्यमातून डिजिटल ओळखपत्रे वितरित केली जातात. मात्र, ही ओळखपत्रे घरी घेऊन जाणाऱ्यांची संख्या वाढल्याने आता कंत्राटदार कंपनीने तांत्रिक डेटाच्या आधारे अशा व्यक्तींशी संपर्क साधणे सुरू केले आहे. ज्या अभ्यागतांकडे ओळखपत्रे राहिली आहेत, त्यांना थेट फोन करून कार्ड परत करण्याची विनंती केली जात आहे. अभ्यागत कोणत्या कामासाठी आले होते आणि त्यांचा संपर्क क्रमांक काय, याची संपूर्ण नोंद संगणकीय प्रणालीत उपलब्ध असल्याने संबंधित व्यक्तींपर्यंत पोहोचणे प्रशासनाला सोपे झाले आहे. विशेष म्हणजे, या संवाद प्रक्रियेला नागरिकांकडूनही प्रतिसाद मिळत असून आतापर्यंत सुमारे ३०० कार्ड्स परत जमा करण्यात आली आहेत.

# ‘स्वीकृत’चे ८० पैकी ५२ अर्ज वैध; आयुक्तांच्या दालनात स्वीकृत छाननी उमेदवाराशिवायच संपन्न!

**छत्रपती संभाजीनगर (अट्टल मत प्रतिनिधी)**

महानगर पालीका छत्रपती संभाजी नगर मधील स्वीकृत सदस्य अर्जदारांची तीन अपत्ये-हर्सूल गाळ घोटाळा- कंत्राटदार असे अनेकजन स्वीकृत सदस्य होण्यास इच्छुक असुन स्वीकृत’चे ८० पैकी ५२ अर्ज वैध झाल्याची घोषणा लेखी स्वरूपात मनपा प्रशासनाने जरी केली असली तरी आयुक्तां च्या दालनात छाननी झाल्याचे स्पष्ट होत असतांना उमेदवारा शिवायच छाननी संपन्न झाल्याचे सुद्धा स्पष्ट होत असल्यामुळे कायदेशीर पेच झाला निर्माण झाला असल्याचे सुद्धा स्पष्ट होत आहे.

**राज्य निवडणूक आयोग मनपावर कारवाई करणार ?** – छत्रपती संभाजीनगर महानगर पालिकेच्या स्वीकृत सदस्य होण्या साठी तीन अपत्ये असलेले,सामाजीक संस्थेत मध्ये एक महिन्यापूर्वी प्रवेश घेतलेले, हर्सूल तलाव गाळ घोटाळ्यात समाविष्ट असणारे अनेक इच्छुक स्वीकृत सदस्य होण्यासाठी आस लावून बसलेले असून राजकीय पक्ष यांचे मुळे अडचणीत आलेले आहेत.

मुंबई हायकोर्टाच्या खंडपीठात हर्सूल गाळ घोटाळ्या तील अनेक समाविष्ट असणारे व्यक्ती यात आहेत हे विशेष होय. पालिका आयुक्त, कंत्राटदार व अन्य प्रतिवादींना नोटीस बजावण्याचे आदेश कोर्टाने दिले होते. हर्सूल तलावातील गाळ काढण्याच्या कामाचे कंत्राट ई-निविदेद्वारे देण्यासंदर्भात शासनाने घालून दिलेले दिशा निर्देश आणि नियमांची पूर्तता न करता कंत्राट देण्यात आल्याचा आक्षेप याचिकेत होते.निर्देश आणि नियमांची पूर्तता न करता कंत्राट देण्यात आल्याचा आक्षेप याचिकेत घेण्यात आलेला होता.

स्वीकृत सदस्य निवडी साठी आता निवडणूक आयोगाचे निर्देशांचे पालन होत नसुन मनपा अधिनियम १९४९ अंतर्गत स्वीकृत सदस्यांची निवड ही सार्वजनिक निवडणुकी नंतर कायद्याने बंधन कारक असते. या अधिनियमाच्या कलम १८ नुसार (किंवा संबंधित तरतुदींनुसार), महानगर पालिकेच्या सार्वजनिक निवडणुकीचा निकाल जाहीर झाल्यानंतर ठरावीक कालावधीत - सामान्यतः एका महिन्याच्या आत महापौर किंवा सभापती मार्फत स्वीकृत सदस्यांची निवड (नॉमिनेशन) करणे आवश्यक आहे. कालबाह्य मर्यादा निवडणूक निकालानंतर तात्काळ (३० दिवसांत) प्रक्रिया सुरू करणे बंधनकारक असतांना आणि त्यात जर उशीर झाल्यास राज्य निवडणूक आयोग व शासन स्तरीय हस्तक्षेप अपेक्षित आहे.जसे छत्रपती संभाजीनगर मनपात अलीकडील घडामोडीं मध्ये दिसते.

**कायदेशीर पेच झाला निर्माण!**

**न्यायालयाचे बोरीकर शिंदे प्रकरणांतील निर्देश** – वैद्यकीय व्यावसायिक शिक्षणतज्ञ,चार्टर्ड अकाउंटंट किंवा कॉस्ट अकाउंटंट,उच्च न्यायालयातील वकील, अभियांत्रिकी पदवीधर, नगर परिषदेचे मुख्य अधिकारी किंवा सहाय्यक आयुक्तउपायुक्त ५ वर्षांसाठी किंवा महानगर पालिकेचे आयुक्त २ वर्षांसाठी सेवानिवृत्तीपूर्वी तसेच मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियम,१९५० अंतर्गत नोंदणीकृत अशासकीय संस्थेचे पदाधिकारी जे महानगर पालिका किंवा परिषदे च्या क्षेत्रात सामाजिक कल्याण कार्यात गुंतलेले आहेत. असे नियम मान्य करून रिट याचिकेला परवानगी देऊन दि २६ जून २०१२चा महापालिके चा ठराव रद्द करून बाजूला ठेवण्यात आला होता. तसेच महापालिका आयुक्त महानगर पालिकेची दुसरी सर्वसाधारण सभा बोलावतील ज्या योगे व्यक्तींना नामनिर्देशित करण्यासाठी ७ व्यवसायां पैकी एक नियम ४ आणि नियम ४ वर दिलेल्या निर्देशावर स्पष्टीकरणा च्या बाबी पुढे आल्या आहेत मनपाने कोणत्या कॅटेगिरी मधून ५२ स्वीकृत अर्ज मंजूर केले याचा स्पष्ट उल्लेख केला नसल्यामुळे कायदेशीर पेच निर्माण झाला आहे.

**प्रीतम बोरीकर, सोनल शिंदे प्रकारणांतील निर्देश दुर्लक्षित** – प्रीतम बोरीकर, सोनल शिंदे निर्देश प्रकारणात दिलेल्या निर्देशांचे पालन केले नाही तर आणि विहित वेळेत या निवड प्रक्रिया पुर्ण केल्या गेल्या नाहीत म्हणुन हा निर्देशांचा भंग ठरणार असुन वेगवेगळे सात वर्गातून त्यांचा तज्ञ असण्याचा अनुभव, मनपास होऊ घातलेली सहकार्य युक्त मदत दुर्लक्षित केल्यास कायद्याचे उल्लंघन प्रशासनास डोके दुःखी ठरणार असुन नामनिर्देशीत सदस्य निवडताना त्यांचा समाज कार्याचा अनुभव, त्यांचा विविध क्षेत्रात असलेला तज्ञ अनुभव विचारात घेता फक्त एखाद्या पक्षाच्या विशिष्ट व्यक्तीचे पत्र पुरेसे ठरणार नसुन न्यायालयीन निर्देशां नुसार स्वीकृत सदस्य निवडणे गरजेचे असुन असे न झाल्यास या सर्व बाबी न्यायालयात जाणार याची चर्चा संपुर्ण शहरात आहे हे विशेष होय. मनपाने रात्री उशिरा जाहीर केली यादी – नाराज कार्यकर्त्याची समजूत घालण्यासाठी राजकीय नेत्यांनी स्वीकृत नगरसेवकांचा अनेकांना शब्द दिला. प्रत्यक्षात आता चित्र वेगळे आहे.

### ‘नवकार करे बेडापार’

# भगवान महावीर जन्मकल्याणकानिमित्त १००८ कोटी नवकार महामंत्र जप अनुष्ठानाचा भव्य संकल्प

**छत्रपती संभाजीनगर (अट्टल मत प्रतिनिधी)**



भगवान महावीर यांच्या २६२५ व्या जन्मकल्याणकानिमित्त, विश्वशांतीचा संदेश देण्यासाठी एक भव्य आणि अनोखा आध्यात्मिक उपक्रम आयोजित करण्यात आला आहे.

तपागच्छप्रवर समितीचे कार्यवाहक आणि पूज्य गच्छाधिपती आचार्य भगवंत श्री विजय अभयदेवसूरीश्वरजी महाराज यांच्या प्रेरणेने, सध्या जगभरात निर्माण होत असलेल्या तणावपूर्ण आणि युद्धजन्य परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर, १००८ कोटी नवकार महामंत्र जप अनुष्ठान करण्याचा संकल्प करण्यात आला आहे. १४ मार्च ते ९ एप्रिल दरम्यान चालणाऱ्या या उपक्रमात, दररोज किमान ४५ मिनिटे कुटुंबासह जप करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

### नवकार जपात सहभागी होण्याचेही आवाहन



तसेच ९ एप्रिल रोजी जागतिक नवकार जपात सहभागी होण्याचेही आवाहन करण्यात आले आहे. ‘नवकार करे बेडापार’ या संदेशासह, सर्वांनी या आध्यात्मिक अभियानात सहभागी व्हावे, असे आवाहन नवकार फाउंडेशनचे प्रकल्प प्रमुख रवींद्र मुगदिया तसेच जीतो चे अध्यक्ष अनिल मामा संचेती यांच्यासह पदाधिकाऱ्यांनी आयोजकांनी केले आहे.

# अल्पसंख्यांक शैक्षणिक संस्था महासंघ विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर १३५ व्या जयंती उत्सव समिती जाहीर

**अध्यक्ष प्रा. प्रकाश सोनवणे तर महासचिव : नबी पटेल, कार्याध्यक्ष म्हणून भीमचरण मोरे यांची बिनविरोध निवड**



प्रा. प्रकाश सोनवणे, अध्यक्ष



नबी पटेल, महासचिव



भीमचरण मोरे, महासचिव



संदिप सोनवणे, प्रसिद्धीप्रमुख

**छत्रपती संभाजीनगर (अट्टल मत प्रतिनिधी)**

१ एप्रिल २०२६ रोजी दुपारी ०२:०० वाजता सुभेदारी विश्रामगृह छत्रपती संभाजीनगर येथे अल्पसंख्यांक शैक्षणिक संस्था महासंघाच्या पदाधिकाऱ्यांची म हत्त्वपूर्ण बैठक होऊन त्यामध्ये विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्ताने अल्पसंख्यांक शैक्षणिक संस्था महासंघ जयंती उत्सव समितीची स्थापना करण्यात आली .

यामध्ये अध्यक्षपदी : ज्ञान संदीप शिक्षण संस्थेचे संस्थापक अध्यक्ष प्रा. प्रकाश सोनवणे यांची निवड करण्यात आली तर महासचिव पदी नबी पटेल कार्याध्यक्षपदी भिमचरण मोरे व उपाध्यक्षपदी विजय पाटोदी यांची बिनविरोध निवड करण्यात आली .

कोषाध्यक्ष : वसंत राठोड प्रसिद्धीप्रमुख : संदीप सोनवणे तर सदस्य : देविदास वाहुळे बि .बी .शिंदे अभिजीत सोनवणे राजकुमार पैठणे सुधाकर पगारे छोटू पटेल सय्यद कबीर तर प्रमुख सल्लागार : सूर्यकांताताई गाडे दौलत दादा खरात जे एल म्हस्के नगरसेवक कैलास गायकवाड सुधाकर बागुल माजी आ. एम एम शेख हाजी लतीफ पटेल यांची निवड करण्यात आली. तर विधी सल्लागार :अँड. सर्जेराव साळवे अँड.प्रवीण कांबळे अँड.नवनाथ गायकवाड अँड. ममता श्रीवास्तव यांची बिनविरोध निवड करण्यात आली .

या जयंती मध्ये कोणाकडूनही वर्गणी न घेता सर्व पदाधिकारी मिळून विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर जयंतीच्यानिमित्ताने विविध उपक्रमाद्वारे जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्याचे नियोजन करण्यात आले.

यामध्ये रक्तदान शिबिर सर्व रोग निदान आरोग्य तपासणी शिबिर रक्तगट तपासणी शिबिर घेणे त्याचबरोबर जयंतीच्या दिवशी मोफत पाण्याच्या बाटल्याचे वितरण करणे शालेय विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करणे विद्यार्थ्यांच्या निबंध स्पर्धा व वक्तृत्व स्पर्धेचे आणि भीम गीत गायन स्पर्धे चे आयोजन करून त्यांना बक्षीस वितरण करण्यात येणार आहे.

# एलिटकेअर रुग्णालयाचे ५ व्या वर्षात यशस्वीरित्या पदार्पण

## कॅथ लॅबची सुरुवात






**छत्रपती संभाजीनगर (अट्टल मत प्रतिनिधी)**

शहरातील विश्वासार्ह आरोग्यसेवा देणाऱ्या एलिटकेअर रुग्णालयाने यशस्वी चार वर्षांचा टप्पा पूर्ण करत नवे पाऊल टाकले आहे. या निमित्ताने अत्याधुनिक कॅथ लॅब सुरू करण्यात आली असून, हृदयविकाराच्या रुग्णांसाठी ही सुविधा अत्यंत उपयुक्त ठरणार आहे. ४ वर्षांचा टप्पा पूर्ण करून ५ व्या वर्षात यशस्वीरित्या एलिटकेअर रूग्णालयाने पदार्पण केले. रूग्णांचा विश्वास जिंकण्यात रूग्णालय व येथील डॉक्टरांचा, तसेच संपूर्ण स्टॉप यशस्वी ठरला आहे. गरीब रुग्णांनाही लवकरात लवकर शासकीय योजनांचा लाभ मि ळावा यासाठी रुग्णालय प्रयत्नशील असून, आगामी काळात अधिक व्यापक आरोग्यसेवा देण्याचा एलिटकेअर रुग्णालयाचा मानस आहे, या प्रसंगी सांगितले.

### विश्वासामुळेच ही प्रगती शक्य -डॉ. संदीप घुले

रुग्णालयाचे संचालक डॉ. संदीप घुले यांनी सांगितले की, रुग्णालयाच्या चार वर्षांच्या प्रवासात नागरिकांनी दिलेल्या विश्वासामुळेच ही प्रगती शक्य झाली आहे. रुग्णांची काळजी घेणे ही आमची प्राथमिकता असून, लवकरच कॅशलेस व विविध शासकीय योजनांची सुविधा सुरू करून अधिकाधिक रुग्णांना लाभ मिळवून देण्यावर आमचा भर असेल, असे त्यांनी नमूद केले. रुग्णालयाचे लोकेशन शहराच्या मध्यवर्ती भागात असल्यामुळे शहरातील तसेच बाहेरून येणाऱ्या रुग्णांसाठी येथे पोहोचणे सोपे आहे. त्यामुळे अनेक रुग्ण एलिटकेअर रुग्णालयाला प्राधान्य देत असल्याचेही त्यांनी सांगितले.

### उपचारात विशेष प्रावीण्य

श्वसनरोग तज्ज्ञ डॉ. नितिन चित्ते यांनी सांगितले की, येथे फुफ्फुसासंबंधी आजारांचे निदान व उपचार अत्याधुनिक पद्धतीने केले जातात. तसेच संसर्गजन्य रोगांवरील उपचारातही रुग्णालयाने विशेष प्रावीण्य मिळवले आहे.

### रुग्ण हाच देव

रुग्णालयातील सर्व सुविधा अत्याधुनिक असून, रुग्ण हाच देव या भावनेतून डॉक्टर व कर्मचारी रुग्णांची सेवा करतात. रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांकडून मिळणारा सकारात्म क प्रतिसाद हीच आमची खरी कमाई असल्याचे काशिनाथ घुले यांनी सांगितले.

### गंभीर उपचारांसाठी कॅथ लॅब अत्यावश्यक

हृदयरोग तज्ञ डॉ. उमेश खेडकर यांनी सांगितले की, ॲन्जिओग्राफी, ॲन्जिओप्लास्टी, पेसमेकर बसविणे तसेच हृदयातील झडपांचे आजार यांसारख्या गंभीर उपचारांसाठी कॅथ लॅब अत्यावश्यक असते. २ एप्रिलपासून ही सुविधा सुरू करत असून, सर्व रुग्णांना प्रामाणिक, विश्वासार्ह आणि वाजवी दरात सेवा देण्याचा आमचा निर्धार आहे, असे त्यांनी स्पष्ट केले.

# भारतीय दलित पँथर विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर १३५ वी जयंती उत्सव महासंघाची कार्यकारिणीची निवड









**छत्रपती संभाजीनगर (अट्टल मत प्रतिनिधी)**

भारतीय दलित पँथर विश्व रत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर १३५ जयंती उत्सव महासंघाची कार्यकारिणीची निवड करण्यात आली २०२६. विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर १३५ जयंती ची बैठक पँथर कार्यालयात संस्थापक अध्यक्ष लक्ष्मण दादा भुतकर यांच्या मार्गदर्शनाखाली जाहीर करण्यात आली. १ एप्रिल ते १४ एप्रिल विविध कार्यक्रमाने जयंती साजरी करण्याचे निश्चित झाले व खालील कार्यकारणीची निवड करण्यात आली.

संस्थापक अध्यक्ष लक्ष्मण दादा भुतकर, अध्यक्ष धम्मपाल दांडगे, सचिव दशरथ कांबळे, उपाध्यक्ष संजय सरोदे, स्वागत अध्यक्ष सिद्धार्थ गवळी, सहसचिव समाधान कस्तुरे, कोषअध्यक्ष अमोल भुतकर, प्रमुख सल्लागार रामदास पगडे, सदस्य राधाकिसन पटेकर, उत्तम डोंगरे, गौतम पगारे, मधुकर आराक, अरुण साठे, जगदेव जाधव, योगेश जुमडे, राजकुमार कांबळे, शरीफ लाला अहमद पठाण, सैय्यद हबीब, महिला सदस्य सुभद्रा बाई कासारे, पार्वतीबाई घोरपडे, निर्मला खाडे, कलावती बाई गवळी, पर्याग बाई इंगळे व प्रमुख संघटक सिद्धार्थ बोर्डे आदी.

# मंत्रालय प्रवेशासाठी लागणारी १० हजार ओळखपत्रे गायब

**मुंबई (अट्टल मत प्रतिनिधी)**

मंत्रालयातील प्रवेश प्रक्रियेत सुसूत्रता आणण्यासाठी सुरू करण्यात आलेल्या ‘डिजी प्रवेश’ प्रणालीतील १० हजार ओळखपत्रे अभ्यागतांनी परत न केल्याची माहिती समोर आली आहे. नियमानुसार प्रवेश संपल्यानंतर ही कार्डे जमा करणे आवश्यक असते; मात्र १० हजार कार्डे मंत्रालयाबाहेर गेल्याने आता प्रशासनाने ती परत मिळवण्यासाठी विशेष मोहीम हाती घेतली आहे. राज्याच्या कानाकोपऱ्यातून नागरिक आपली कामे घेऊन मंत्रालयात येत असतात. त्यांना जलद प्रवेश मिळावा यासाठी अत्याधुनिक ‘डीजी ॲप’च्या माध्यमातून डिजिटल ओळखपत्रे वितरित केली जातात. म त्र, ही ओळखपत्रे घरी घेऊन जाणाऱ्यांची संख्या वाढल्याने आता कंत्राटदार कंपनीने तांत्रिक डेटाच्या आधारे अशा व्यक्तींशी संपर्क साधणे सुरू केले आहे. ज्या अभ्यागतांकडे ओळखपत्रे राहिली आहेत, त्यांना थेट फोन करून कार्ड परत करण्याची विनंती केली जात आहे. अभ्यागत कोणत्या कामासाठी आले होते आणि त्यांचा संपर्क क्रमांक काय, याची संपूर्ण नोंद संगणकीय प्रणालीत उपलब्ध असल्याने संबंधित व्यक्तींपर्यंत पोहोचणे प्रशासनाला सोपे झाले आहे.

हे साप्ताहिक मालक, मुद्रक , प्रकाशक व संपादक - श्री. रशपालसिंघ एन.अट्टल यांनी मानसी प्रिंटर्स, प्लॉट नं. ४५, सर्व्हिस इंडस्ट्री सेक्टर सिडको, औरंगाबाद ४३१००५ (महा.) येथे छापून कार्यालय : शॉप नं. ३, केशरदिप कॉम्प्लेक्स, एन- ७ पोलीस स्टेशन जवळ, सिडको , औरंगाबाद ४३१००३, (महा.) येथे प्रसिध्द केले. या अंकातील मजकुराशी संपादक जबाबदार राहतीलच असे नाही ( यासंबधी कोणताही वाद औरंगाबाद न्यायालयात राहील.) मो. ७५८८१६६४९६, ९६२३४८४८४८. email : attalmat@gmail.com. RNI.No. MAHMAR/2007/21199